**Historicity Research Journal**
**Volume 1 | Issue 5 | Jan 2015**
**ISSN:- 2393-8900**

Research Article

# *आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत वसंतराव नाईक यांचे योगदान*
## *एक विश्लेषनात्मक अध्ययन*

***मनोज पांडुरंग ठाकरे***

इतिहास विभाग , श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद .

***सांराश :***

आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीत स्व.वसंतराव नाईक यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. आज आधुनिक महाराष्ट्र सर्वच दृष्टिकोनातून अग्रेसर दिसतो. महाराष्ट्राची प्रगतीच्या दिशेने होणारी वाटचाल उल्लेखणीय आहे. यामध्ये बऱ्याच प्रमाणात स्व.वसंतराव नाईक यांचे कार्य महत्वपूर्ण असे आहे. महाराष्ट्र राज्य निर्मीतीनंतर महाराष्ट्रीय जनतेसमोर अनेक समस्येचा जणु डोंगरच उभा ठाकला होता. त्यातील बऱ्याच समस्या सोडविण्यासाठी श्री.वसंतराव नाईक साहेबांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थीदशेपासूनच समाजकार्याची आवड असणारे नाईक साहेब महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित झाले व त्यांनी अखंड समाजकार्याचा जणु वसाच घेतला. शेतीविषयक महत्वपूर्ण सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, शेतकऱ्यांच्या समस्येचे उच्चारन, अंधश्रध्दा, रूढी, परंपरा, या सारख्या अनेक सामाजिक समस्याचे त्यांनी उच्याटन केले. म्हणुनच आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे योगदान महत्वपूर्ण होते असे म्हटल्या जाते.

### *प्रस्तावना :*

प्रस्तुत लेखात वसंतराव नाईक यांचा जीवनपरिचय, शेतीविषयक सुधारणा, कृषी विद्यापीठ स्थापनेतील योगदान, सामाजिक क्षेत्रातील योगदान, ग्राम सुधारणा, ग्रामीण व शहरी भागात पाणी पुरवठा, आरोग्य विषयक सुधारणा, दारूबंदी, स्त्रियांना प्रतिष्ठा, अंधश्रध्दा निर्मुलन, दुष्काळ निवारण व निष्कर्ष इत्यादी बाबीचा समावेश केला आहे.

### *जीवन परिचय :*

वसंतराव नाईक यांचा जन्म यवतमाळ जिल्हयातील पुसद तालुक्यातील गहुली या गावी दि. 1 जुलै 1913 ला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव फुलसिंग व आईचे नांव हेनूबाई असे होते. वसंतरावांना लहान पणापासूनच शिक्षणाची खुप आवड होती व त्या दिशेने त्यांचा जीवन प्रवास बि.ए.ची परीक्षा पास झाले. व त्यानंतर त्यांनी नागपूर विद्यापीठाच्या ''युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ लॉ'' या कमासाठी प्रवेश घेतला व त्यांनी 1940 ला कायद्याचा अभ्यासक्रम पूर्ण केला. जुन्या मध्यप्रदेश या राज्यात वसंतराव हे बंजारा समाजातील पहिले वकील होय.

वसंतराव नाईक यांनी आपल्या वकिली व्यवसायाला नुकतीच सुरवात केली होती. त्याच दरम्यान 6 जुलै 1941 रोजी त्यांचा विवाह वत्सलाबाई यांच्याशी झाला. त्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरवात नगरपालिकेपासून केली. 1946 ते 1950 या काळात ते पुसदचे नगराध्यक्ष झाले व त्यांच्या राजकीय जीवनाच्या वाटचालीत ते प्रचंड यशस्वी ठरून त्यांनी 5 डिसेंबर 1963 ते 19 फेब्रुवारी 1975 या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन काम केले.

वसंतराव नाईक हे शेतकरी पुत्र असल्याने त्यांना शेती विषयी प्रचंड आस्था होती. त्यांनी महाराष्ट्रात ''एकाधिकार योजना'' सुरू केली व त्यामुळे उत्पादकाला योग्य भाव देवून दलाली बंद करणे सरकारला शक्य झाले. त्यांच्या काळात 'ग्रामीण रोजगार हमी व गरीबी ठराव योजना' हे त्यांचे सर्वात मोठे योगदान समजले जाते.

### *शेतीविषयक सुधारणा :–*

आधुनिक महाराष्ट्राच्या वाटचालीत स्व.वसंतराव नाईक यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. महाराष्ट्र राज्य निर्मीतीनंतर अनेक समस्या महाराष्ट्रातील जनतेसमोर होत्या. त्यातीलच एक प्रमुख समस्या म्हणजे शेतीविषयक समस्या होय. दुष्काळ, पुर, अतीवृष्टी इत्यादी नैसर्गिक कारणाबरोबरच सिंचनाची सोय नसणे, सरकारचे योग्य धोरण नसणे, मालाला योग्य भाव नसणे, तंत्रज्ञानाचा अभाव या सारख्या अनंत अडचणीला शेतकऱ्याला सामोरे जावे लागत होते. म्हणजेच तत्कालीन शेतीविषयक समस्येने अत्यंत उग्र रूप धारण केलेले दिसून येते. या सर्व बाबीवर उपाययोजना होणे आवश्यक होते.

महाराष्ट्रात अन्न धान्याचे उत्पादन वाढावे व राज्य स्वयपूर्ण व्हावे. या एकाच ध्येयाने अस्वस्थ झालेले महान नेते म्हणजे कै. वसंतराव नाईक होय. जिथ जाईन तिथ शेतीचा प्रचार करीन, शेतकऱ्याच्या अडचणी दुर करीन ही भुमिका घेवून त्यांनी शेतीविषयक समस्येला प्राधान्य दिले. त्याच प्रमाणे महाराष्ट्राला ओघानेच देशाला अन्नधान्याबाबत स्वंयपूर्ण करावे हा निर्धार त्यांनी केला असल्याने शेतीच्या बाबतीत ज्या काही समस्या आहेत त्या समस्या दुर करण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला दिसतो. संकरीत पिकांचा कार्यक्रम राज्यात मोठया प्रमाणावर राबविला जावा आणि त्या बरोबर शेतकऱ्यासोबतच राज्य स्वयंपूर्ण व्हावे याचा ध्यास श्री. वसंतराव नाईक यांनी घेतला होता. 'राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपूर्ण झाले नाही तर मी फासावर जाण्यास तयार आहे, असे आव्हान त्यांनी स्विकारले. संकरीत ज्वारी उत्पादनाचा विचार रात्रंदिवस त्यांच्या मनात असे. त्यांनी आपल्या गहुली येथील शेतात संकरीत ज्वारी चे उत्पादन घेतले व त्यांच्याच प्रेरणेणे संकरीत पिकांची मोहिम राज्यात सुरू झाली.

नाईक साहेब शेतीला उद्योगाची जननी मानत असे. शेतकऱ्यांनी शेतीला पुरक जंगल विकास, पशुपालन, मधुमाक्षिकापालन आदि व्यवसायाची सांगड घातली. तर शेतकऱ्यांचा विकास होवून बऱ्याच प्रमाणात शेतीविषयक समस्या दुर केल्या जावू शकतात. यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शेतकऱ्यापर्यंत अधिक उत्पादन देणारे बिज नेता आले तर त्यांचे उत्पादन निश्चितच वाढेल व त्यासाठी नाईक साहेबांनी 'महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. राज्य पातळीवर आपल्या गरजानुसार, हवामानानुसार, पर्जन्यमानानुसार आणि मातीची प्रत पाहून सुयोग्य बियाण्यांची निर्मिती करणारे राज्य पातळीवरचे बियाणे महामंडळाची निर्मिती ही नाईक साहेबांची फार मोठी शेतीच्या क्षेत्रातील दुरदृष्टी होती. त्याचप्रमाणे जमिनीचे सपाटीकरण करून शेतीची उत्पादकता वाढविण्याचा प्रयत्न श्री.वसंतराव नाईक यांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून केल्याचे दिसून येते.

शेतकऱ्यांची सिंचना विषयाच्या समस्येचे निस्सारण व्हावे याकरिता मुख्यमंत्री असतांना वसंतराव नाईकांनी उजनी प्रकल्प (सोलापूर) अप्पर वर्धा धरण, जायकवाडी प्रकल्प, यवतमाळ जिल्हयातील अरूणावती धरण इत्यादी प्रकल्पाची कामे त्यांनीच शेतीच्या हिताच्या दृष्टीने मार्गी लावलीत. महाराष्ट्रातील शेतकरी पांढरे सोने पिकवितो मात्र व्यापारी त्यांची लुट करीत असतो. हे थांबविण्यासाठी श्री नाईक साहेबांनी ''कापुस एकाधिकार योजना'' प्रस्थापित केली व 'कापूस ते कापड' या योजनेच्या माध्यमातुन त्यांनी शेतकरी हिताचे काम केले. (1)

### *कृषि विद्यापीठ स्थापनेतील योगदान :–*

वसंतराव नाईक यांना लहानपणापासुनच शेतकऱ्यांच्या समस्या, वेदना व व्यथा माहित होत्या. शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन नसल्याने, सिंचन नसल्याने व आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असल्याने शेतकरी योग्य पध्दतीने शेती करू शकत नाही व त्यामुळे त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते हा अडथळा दुर करण्याकरिता त्यांनी राज्यात कृषि विद्यापीठांची निर्मीती केली. त्यांच्याच अथक प्रयत्नातून राहूरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अकोला येथे पंजाबराव कृषी विद्यापीठ, परभणी येथे मराठवाडा कृषी विद्यापीठ व दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची निर्मीती झाली. त्यामुळे या विद्यापीठातून निर्माण केल्या जाणाऱ्या आधूनिक तंत्रज्ञानामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना अधिक उत्पादन देणारे वाण, पिकांचे समग्र ज्ञान, मार्गदर्शन याचा फायदा होत आहे. (2)

### *सामाजिक क्षेत्रातील योगदान :–*

आपल्या पित्याने केलेले समाजकार्य बालपणापासून पहात आलेल्या वसंतराव नाईकांना समाजसेवेचे बाळकडू त्यांनी आपल्या वडिलांपासून घेतले होते. शालेय जीवनामध्ये बहुजन समाजासाठी झटणारे महात्मा फुले, दलितांच्या मानवी हक्कासाठी लढणारे भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. बाबासाहेबांनी दलित समाजाच्या उध्दारासाठी केलेल्या समाज– क्रांती पासूनच वसंतराव नाईकांनी प्रेरणा घेतली होती. डोंगराच्या पायथ्याशी तांडा करून राहणाऱ्या या समाजाच्या पोषाखापासून त्यांनी जुनी परंपरा तोडण्यास सुरवात केली. समाजातील वाईट चालीरिती मोडून टाकण्यासाठी अथक प्रयत्न केले. दारू सोडण्यापासून लोकांना परावृत्त करणे, चोरी, मारामारी या सारख्या प्रवृत्तीचा बीमोड करणे व शिक्षणाचे महत्व लोकांना पटवून देणे. या सारखी कामे त्यांनी या भटक्या जमातीत चैतन्य आणण्यासाठी केले. (3)

***ग्राम सुधारणा :***

ग्रामीण भाग हा अनेक समस्यांनी ग्रासलेला आहे. तेंव्हा ग्रामीण भागातील लोकांना अनेक हालअपेष्टांना सामोरे जावे लागते. याची जाण वसंतराव नाईकांना होती म्हणुनच त्यांनी ''ग्रामसुधारणा मोहीम'' सर्वप्रथम राबविल्याचे दिसते व खेडयाच्या विकासाकडे लक्ष दिले. त्याच प्रमाणे गावा–गावात जावून लोकांना एकत्र करून लोक जागृती करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. गावांना चांगले रस्ते असल्याशिवाय त्या गावचा इतर गांवाशी किंवा खेडयाशी सबंध येवू शकत नाही. परिणामी ते गाव संपूर्णपणे दुर्लक्षित राहते. या सारख्या महत्वाच्या बाबी गावकऱ्यांना पटवून देवून अनेक खेडयातील ग्रामस्थाकडून रस्ते करवून घेतले. आणि लोकांना श्रमदानाचे महत्व पटवून दिले. खेडयामध्ये शिक्षणाचे महत्व कळावे या करिता खेडयातील प्रत्येक गावात शाळा सुरू केल्या. त्यांच्या कार्याचा वलय जस–जसा वाटू लागला, तसतसा ग्रामीण भाग, ग्रामीण समाज सुधारला जावू लागला. वसंतराव नाईकांनी पुसद तालुक्यातील प्रत्येक गावातील रस्ते रेखीव केले. गहूली, चोंढी, बान्सी इत्यादी गाव आदर्श खेडे बनविले. पूर्वीची वेडीवाकडी वसाहत, गावांची रचना त्यांनी प्रमाणबध्द पध्दतीने बसविली. आता पुसद तालुक्यातील प्रत्येक गाव पुसदशी एस.टी.बसने जोडले आहे. अनेक खेडयापाडयात माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांची सोय झाली आहे. साक्षरतेची सुरू केलेली मोहिम त्यांनी यवतमाळ जिल्हयातील अनेक खेडयापाडयापर्यंत पोहचविली. प्रत्येक गावात साक्षरतेचे महत्तम कार्य केले व त्याच प्रमाणे अनेक आदर्श कार्यक्रमांनी त्यांनी आपले गहूली हे गाव यवतमाळ जिल्हयातील आदर्श गाव बनविले. (4)

***ग्रामीण व शहरी भागात पाणी पुरवठा :–***

त्या काळामध्ये ग्रामीण व शहरी भागात पाण्याचा अत्यंत तुटवडा होता. लोकांना अशुध्द पाणी प्यावे लागत. त्यामुळे वेगवेगळे साथीचे आजार यायचे या करिता वसंतराव नाईकांनी ''पाणी पुरवठा योजना'' तयार केली. शासनाकडून त्यास मंजुरी मिळवून घेतली. अनेक छोटया मोठया जलसिंचन योजना, नद्यावरील छोटे मोठे बंधारे, शेततळे अशा अनेक योजना अमलात आणल्या. 1957 साली दुसरी सार्वत्रिक निवडणूक झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळात वसंतराव नाईकांची ''कृषी मंत्री'' पदावर निवड झाली. त्याच्या कारकीर्दीत महाराष्ट्रातील शेती ओलिताखाली आणण्याचा त्यांनी जास्तीत जास्त प्रयत्न केला. जलसिंचन योजनेशिवाय, छोटया–छोटया बंधाऱ्याशिवाय, विहिरीच्या पाण्याशिवाय महाराष्ट्राची अधिक–अधिक, शेती पाण्याखाली येणार नाही म्हणुन या योजनासाठी वसंतराव नाईकांनी खास प्रयत्न केले. शेतकऱ्यांना या योजनासाठी 'तगाई' देण्याची योजना अमलात आणली. या तगाईची रक्कम ही जास्तीत जास्त रहावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यामुळे विहिरी खोदाई, पंपिंग सेट, छोटे–मोठे तलाव, बंधारे इत्यादी अधिका–अधिक प्रमाणात वाढू लागले. विदर्भात व महाराष्ट्रातही आज अनेक ''वसंत बंधारे'' आहेत. पुसद तालुक्यातील ''ईसापूर, चिखली (कॅम्प) येथे पुस धरण बांधले व त्या धरणाला 'वसंत सागर पुस धरण' असे नामकरण करण्यात आले. या धरणाचा उपयोग लोकांना पाणी पिण्यासाठी व जलसिंचनासाठी होत आहे. पुस नदिवर 30 हजार एकर जमीन ओलिताखाली आणली जात आहे. (5)

***आरोग्य विषयक सुधारणा :***

वसंतराव नाईकांनी ग्रामीण भागातील आरोग्याचा महत्वपूर्ण प्रश्न निकाली काढला. तेथील लोकांना वेळेवर औषध उपचार होत नसल्यामुळे प्रसंगी आपले प्राण गमवावे लागत असे त्या करिता त्यांनी ''प्राथमिक आरोग्य केंद्राची'' सुरवात केली व त्या दवाखान्यात औषधांचा भरपूर साठा उपलब्ध करून दिला. प्राथमिक आरोग्य केंद्रात स्त्रियांच्या आरोग्याची व्यवस्थित पाहणी करण्याकरिता ''लेडी डॉक्टर'' नव्हत्या त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्य विषयक समस्या वाढल्या होत्या. त्या करिता वसंतराव नाईकांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात लेडी डॉक्टर, नर्स याची नेमणूक केली. रोग्यासाठी राहणाऱ्या जागेत वाढ केली. आज प्रत्येक गावात व शहरात प्राथमिक आरोग्य केंद्र व्यवस्थीतरित्या सुरू आहेत.

कुटूंब नियोजनात वसंतराव नाईकांनी उल्लेखणीय कार्य केले. या करिता खेडयापाडयात शिबीरे भरविली. त्यामुळे जवळपास नोव्हें. 1957 ते 31 मार्च 1975 या पर्यंतच्या काळात 28 लाख 40 हजार स्त्री–पुरूषावर कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्या. (6)

***दारूबंदी :–***

मुख्यमंत्री झाल्यानंतर वसंतराव नाईक यांच्या सामाजिक कार्याचे क्षेत्र अधिक व्यापक बनल्याचे दिसून येते. आपल्या समाजातील दारूचे व्यसन आणि त्याचा घातक परिणाम त्यांनी पाहिला होता. शिवाय या व्यसनातून त्यांना मुक्त करण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्वानुसार इतर राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यानेही दारूबंदीचा कार्यक्रम अमलात आणण्यास प्रारंभ केला. महाराष्ट्रात संपूर्ण दारूबंदीचे उद्धीष्ट 1950 साली ठरविण्यात आले. दारूबंदी साठी वसंतराव नाईकांनी अविरत प्रयत्न केल्याचे आपल्याला दिसते. (7)

### *स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून दिली.*

वसंतराव नाईकांनी ज्यावेळी आंतरजातीय विवाह केला, त्या वेळेसचा विचार केला तर नाईकांचा आणि वत्सलाबाईचा विवाह ही क्रांतीकारक घटनाच होती. वसंतराव नाईक हे बंजारा जातीचे आणि वत्सलाबाई ब्राम्हण जातीच्या होत्या. राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे नेते नेहमीच स्त्री—स्वतंत्र आणि स्त्रियांची प्रतिष्ठा यावर नेहमीच जोर देवून व्याख्याने देतात. परंतू क्वचीतच कोणी आपल्या पत्नीला सार्वजनिक समारंभात आणतांना दिसतात. आपण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात जे काम करतो त्यांच्याशी आपल्या पत्नीचा जणू काही सबंध नसावा, अशीच त्यांची धारणा झालेली दिसते. अशा समाजसुधारकाहून वसंतराव नाईकांचे आचार—विचार निश्चित निराळे होते हे त्यांनी वत्सलाबाईंना ज्या पध्दतीने प्रकाशात आणले, त्यावरून सिध्द होते.

### *अंधश्रध्दा निर्मुलन :—*

तत्कालीन ग्रामीण समाजामध्ये सर्वत्र अज्ञानरूपी अनाचार पसरलेला होता. रूढी—परंपरेने सर्वसामान्य माणसाला जंग—जंग पछाडलेले होते. ग्रामीण जनतेत वाईट रूढी, प्रथा, परंपरा, धार्मिक अंधश्रध्दा, दुष्ट चालीरिती, हुंडा, नवस, विवाह पध्दतीतील मागासलेपणा, शिक्षणाबद्दलची उदासिनता घालविण्याकरिता त्यांनी गावा—गावात सभा घेवून मार्गदर्शन केले व जुनाट प्रथा—परंपरा सोडण्याचा आग्रहीपणे पुरस्कार केला. (8)

### *दुष्काळ निवारण :—*

1972 चा दुष्काळाचा सामना करतांना नाईक साहेबांनी जे परिश्रम घेतले त्याला तोड नाही. दुष्काळी कामाची पाहणी करतांना कित्येक किलोमीटर पर्यंत रखरखत्या उन्हात ते पायी चालत असत. त्या वेळी दुष्काळात पिण्याच्या पाण्यापेक्षा अन्नधान्याच्या कमतरतेने भीषण स्वरूप धारण केले होते. भूकबळी होवू नये म्हणून वसंतराव नाईकांनी प्रशासनाला व स्थानिक लोकप्रतिनिधीला सक्त आदेश दिले होते. भूकबळी होवू नये, ही केवळ सरकारची जबाबदारी न समजता त्या गावातील समाजाची सुध्दा ती नैतिक जबाबदारी आहे. त्या दृष्टीकोणातून पोलीस पाटील व सरपंच यांना गावातील भूकबळी साठी जबाबदार धरले जाईल. असा फतवा त्यांनी काढला होता. 1972—73 च्या दुष्काळामधूनच क्रांतिकारी अशा रोजगार हमी योजनेने महाराष्ट्रात आकार घेतला. कार्ल मार्क्सच्या श्रम शक्तीविषयक योजनेसारखी ही योजना म्हणजे वि.स.पागे साहेब व नाईक साहेब यांनी महाराष्ट्राला दिलेली फार मोठी देणगी होय. या योजनेच्या अंमलबजावणीच श्रेय नाईक साहेबांनाच जाते व त्यातही रोजगाराची हमी देणारी एवढी मोठी व क्रांतीकारी योजना सुरू करणारे महाराष्ट्र हे देशपातळीवरचे पहिले राज्य होते. यारून असे म्हणता येईल की, वसंतराव नाईकांचे दुष्काळ निवारण्यासाठी केलेले कार्य उल्लेखणीय असे होते. (9)

### *निष्कर्ष :—*

काळया आईच्या हृदयावर हिरवाईचे गोंदण कोरणाऱ्या भूमिपुत्र वसंतराव नाईक यांचे कार्य विशिष्ट समाजापुरते विशिष्ट प्रदेशापर्यन्त सिमित न राहता त्यांचे कार्य संपूर्ण महाराष्ट्रात दिसते. त्यांचे शेतीविषयक, सामाजिक व त्याचबरोबर आर्थिक कार्य संपूर्ण महाराष्ट्रात उल्लेखनिय आहे. त्यांच्या कार्यामुळेच आधुनिक महाराष्ट्राला, देशाला अग्रगण्य स्थान लाभले असे म्हणता येईल.

### *संदर्भ ग्रंथ सुची*

*१)श्री. भावे मधुकर, महानायक पृष्ठ क्र. ७२, १३६*
*२)श्री. गाडे सोपान, श्री.वसंतराव नाईक पृष्ठ क्र. ३१,*
*३)श्री. दर्डा विजय, लोकमत, (सपा) (व.ना.श.पू.वि.१९७३) पृष्ठ क्र. ३*
*४)श्री. राठोड राजाराम, हिरवी क्षितीजे, १९८७ पृष्ठ क्र. ७८*
*५)श्री. रूद्रवार अु.गो. (सपा) स्मरणिका (व.ना.स्मृ.प्र) पृष्ठ क्र. ६*
*६)श्री. राठोड राजाराम, हिरवी क्षितीजे, १९८७ पृष्ठ क्र. ३६*
*७)श्री. दर्डा विजय, लोकमत, (सपा) (व.ना.श.पू.वि.१९७३) पृष्ठ क्र. ४*
*८)श्री. चव्हाण संजय स्मरणिका (सपा) (व.ना.स्मृ.प्र. २००२) पृष्ठ क्र. १५*
*९)स्मरणिका (व.ना.स्मृ.प्र.२०११) पृष्ठ क्र. २३*